26 FEB 2020

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हा...

# शिवाजी महाराजांचे व्यवस्थापन कौशल्य प्रेरणादायी

## कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे : रायरेश्वर येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराचा समारोप : विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यवस्थापन कौशल्य हे तत्कालीन परिस्थितीप्रमाणेच आजही तितकेच प्रेरणायी, आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. रायरेश्वर येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यापीठस्तरीय विशेष श्रम संस्कार शिबिरात ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, अफझल खानाचा वध ही काही एका दिवसात झालेली घटना नव्हती, तर महाराजांनी त्यासाठी पूर्वतयारी केली होती. यासाठी वेळ, ठिकाणाबरोबरच कोण मावळे सोबत घ्यायचे, या विषयी सुद्धा तयारी केल्याचे आढळते. यातून महाराजांच्या व्यवस्थापन कौशल्याची व कुशल नेतृत्वाची प्रचिती येते.



**रायरेश्वर :येथे आयोजीत राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमशिबिराचे उद्‌घाटन छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादनाने करण्यात आले. याप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र. कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के आदी.**

महाराजांच्या या गुणांचा अभ्यास करून स्वत:च्या जीवनात कसा बदल करावा, या विषयी तरुणांनी विचार करणे गरजेचे आहे.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, वयाच्या सोळाव्या वर्षी शिवरायांनी स्वराज्याची शपथ घेतली, त्या पवित्र ठिकाणी आपण उपस्थित आहोत, हे आपले भाग्य आहे. सोळाव्या वर्षी केलेला संकल्प त्यांनी सत्यात उतरवला. आजची पिढी सोळाव्या वर्षी काय करते आहे, याचा अंतर्मुख होऊन विचार करण्याची वेळ आली आहे.

अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ आय. एफ. पैलवान यांनी केला. त्यांनी विद्यार्थ्यांनी अतिशय अवघड काम कमी वेळेमध्ये पूर्ण केल्याबद्दल कौतुक केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे माजी बी.सी.यु.डी. संचालक प्राचार्य डी. आर. मोरे, डॉ. डी.के. गायकवाड, क्रीडा संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. अभय जायभाये, ज्ञानदीप सोसायटीचे चेअरमन व्ही. जी. पवार उपस्थित होते.

**पाच दिवसीय शिव परिक्रमा**

शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे शिवपरिक्रमा गडकोट किल्ले संवर्धन या उपक्रमांतर्गत १६ ते २० फेब्रुवारी या दरम्यान रायरेश्वर येथे आयोजित केले, वाई येथील किसन वीर महाविद्यालय आणि शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यांतील २०० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले. शिबिराचे उद्‌घाटन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते झाले. यावेळी जनता शिक्षण संस्थेचे संचालक सुरेश यादव उपस्थित होते. शिबिराच्या शेवटच्या दिवशी सकाळी सर्व विद्यार्थ्यांनी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व अन्य मान्यवरांसह रायरेश्वर ते केंजळगड अशी परिक्रमा केली. शिबिराचा समारोप जनता शिक्षण संस्थेचे सहसचिव प्रा.नारायण चौधरी यांच्या हस्ते झाले.

# शिवरायांचे व्यवस्थापन प्रेरणादायी : कुलगुरू

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यवस्थापन कौशल्य हे तत्कालीन परिस्थितीप्रमाणेच आजही तितकेच प्रेरणादायी आहे. महाराजांच्या या गुणांचा अभ्यास करून स्वतःच्या जीवनात कसा बदल करावा, याविषयी तरुणांनी विचार करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी रायरेश्वर येथे केले.



**रायरेश्वर : येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यापीठस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित मान्यवर व विद्यार्थी.**

रायरेश्वर येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यापीठस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबिरात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, अफझल खानाचा वध ही काही एका दिवसात झालेली घटना नव्हती, तर महाराजांनी त्यासाठी जवळजवळ वर्षभर आधी तयारी केली होती.

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, वयाच्या सोळाव्या वर्षी शिवरायांनी स्वराज्याची शपथ घेतली, त्या पवित्र ठिकाणी आपण उपस्थित आहोत, हे आपले भाग्य आहे. अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आय. एफ. पैलवान यांनी केला.

यावेळी शिवाजी विद्यापीठाचे माजी बी.सी.यू.डी. संचालक प्राचार्य डी. आर. मोरे, डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. अभय जायभाये, ज्ञानदीप सोसायटीचे चेअरमन व्ही. जी. पवार उपस्थित होते.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यापीठस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या शेवटच्या दिवशी सकाळी ७ वाजता सर्व सहभागी विद्यार्थ्यांनी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व अन्य मान्यवरांसह रायरेश्वर ते केंजळगड अशी परिक्रमा केली.

### सामाजिक न्यायमंत्री कटारिया : 'दिव्यांग उन्नती' अंतर्गत शिबिराचे आयोजन

# दिव्यांगांना बॅटरीवर चालणारी ट्रायसायकल देणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय विभागांतर्गत कार्यरत असणाऱ्या 'एल्मिको'च्या माध्यमातून गेल्या सात वर्षांत देशातील ५ लाख १० हजार दिव्यांगांना ४१८ कोटी रुपये खर्चून साहित्य वितरित करण्यात आले आहे. केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रतनलाल कटारिया यांनी ही माहिती दिली. यापुढील काळात बॅटरीवर चालणारी ट्रायसायकल, जॉयस्टिक ऑपरेटेड व्हीलचेअर यासारखी आधुनिक साधनेही देण्यात येणार आहेत.



कोल्हापूर जिल्हा परिषदेच्यावतीने आयोजित दिव्यांग उन्नती अभियानांतर्गत मंगळवारी केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रतनलाल कटारिया आणि रामदास आठवले यांच्या हस्ते दिव्यांगांना साहित्य वितरित करण्यात आले. यावेळी डावीकडून डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, डॉ. देवानंद शिंदे, दौलत देसाई, धैर्यशील माने, बजरंग पाटील, संजय मंडलिक, निलोफर आजरेकर, प्रवीण यादव, बी. के. गुप्ता, अमन मित्तल उपस्थित होते.

कोल्हापूर जिल्हा परिषद आणि जिल्हा प्रशासनाच्यावतीने शिवाजी विद्यापीठामध्ये आयोजित जिल्ह्यातील दिव्यांगांसाठीच्या साहित्य वितरण समारंभामध्ये ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले होते.

कटारिया म्हणाले, कोल्हापुरातील हे ५७६ वे शिबिर असून, यापुढच्या काळात दिव्यांगांना उत्तम दर्जाचे साहित्य देण्यासाठी 'एल्मिको'ने जर्मनीतील ऑटोबॉक, इंग्लंडमधील मोटिवेशन ट्रस्ट यासारख्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांसोबतही सामंजस्य करार केले आहेत.

कोल्हापूर जिल्हा परिषदेचा गौरव करून कटारिया म्हणाले, आज या शिबिरामध्ये १० कोटी रुपये खर्च करून १५ हजार ६९५ दिव्यांगांना २३ हजार ४९५ साधने वितरित करण्यात आली आहेत. आपल्याकडे असलेल्या जलशक्ती मंत्रालयाच्या माध्यमातून २०२४ पर्यंत देशातील १५ कोटी घरांना ३ लाख ६० हजार कोटी रुपये खर्च करून नळांद्वारे पाणीपुरवठा केला जाणार आहे. तसेच ४० हजार कोटी रुपये खर्च करून पवित्र गंगानदी स्वच्छ करण्याचे कामही सुरु आहे. अटल भूजल योजनेच्या माध्यमातून जमिनीतील पाण्याची पातळी वाढवण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे.

रामदास आठवले म्हणाले, 'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सामाजिक न्याय विभागाला ८५ हजार कोटी रुपयांचा निधी देण्यात आला असून, त्यातील ९५० कोटी रुपये दिव्यांगांसाठी खर्च करण्यात येत आहेत. त्याच जिल्ह्यातून राजर्षी शाहू महाराजांनी समतेचा विचार रुजवला. याच भूमीतील कोल्हापूर जिल्हा परिषदेने हे शिबिर आयोजित करून दिव्यांगांच्या आयुष्याला उभारी देण्याचे काम केले आहे. खासदार धैर्यशील माने म्हणाले, जिल्ह्यातील दिव्यांगांना एवढ्या मोठ्या प्रमाणावर साहित्य देण्याचा नेटका कार्यक्रम राबविण्यात आला. जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यासाठी अभिनंदनास पात्र आहेत. जिल्हा परिषद अध्यक्ष बजरंग पाटील म्हणाले, बरेच महिने रेंगाळलेला हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वांचेच सहकार्य लाभले आहे. प्रत्येक तालुक्याला कार्यक्रम घेऊन सर्व दिव्यांगांना हे साहित्य पोहोच केले जाणार आहे.

जिल्हाधिकारी दौलत देसाई यांनी प्रास्ताविक केले. समाजकल्याण समिती सभापती स्वाती सासने यांनी आभार मानले. यावेळी महापौर निलोफर आजरेकर, कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, सभापती प्रवीण यादव, हंबीरराव पाटील, डॉ. पद्माराणी पाटील, सदस्य सुभाष सातपुते, पांडुरंग भांदिगरे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी रविकांत आडसूळ आणि जिल्हा समाजकल्याण अधिकारी दीपक घाटे यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले. मुख्य कार्यक्रमाआधी दिव्यांग विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कार्यक्रमाला उपस्थितांनी दाद दिली.

## जिल्हा परिषद पदाधिकारीच आले उशिरा

हा कार्यक्रम जिल्हा परिषदेच्यावतीने आयोजित करण्यात आला होता. परंतु दोन्ही केंद्रीय मंत्री वेळेत आले, तेव्हा बांधकाम सभापती हंबीरराव पाटील वगळता एकही पदाधिकारी उपस्थित नव्हता. स्वागत, प्रास्ताविक झाल्यानंतर अध्यक्ष बजरंग पाटील, सभापती स्वाती सासने, डॉ. पद्माराणी पाटील, प्रविण यादव आणि उपाध्यक्ष सतीश पाटील आले. त्यामुळे व्यासपीठावरील सर्व मान्यवरांचे स्वागत मुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल यांना करावे लागले. कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री वेळेत येतात आणि ज्यांचा कार्यक्रम आहे तेच पदाधिकारी उशिरा येतात याची चर्चा कार्यक्रम ठिकाणी सुरु होती. गाडीला अपघात झाल्याने उशिरा आल्याचे स्वाती सासने यांनी सांगितले.

## 'लोकमत'चा उल्लेख

खासदार संजय मंडलिक यांनी या दिव्यांगांचे साहित्य पडून असल्याबाबत 'लोकमत'ने वृत्त प्रकाशित केल्यानंतर आपण केंद्रीय मंत्र्यांची भेट घेतली आणि त्यानंतर हा कार्यक्रम निश्चित झाल्याचे सांगितले. यापुढच्या काळात वेळेत कार्यक्रम व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

### शिवाजी विद्यापीठात 'मूडल'चा वापर; ऑनलाईन प्रणाली कार्यान्वित

# घरबसल्या १२४७ अभ्यासक्रमांचे शिक्षण

संतोष मिठारी ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** प्रशासनाबरोबरच शिक्षण पद्धतीत शिवाजी विद्यापीठाकडून नवतंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यात येत आहे. याअंतर्गत विविध १२४७ अभ्यासक्रम हे विद्यापीठाने 'मूडल' (मॉड्युलर ऑब्जेक्ट ओरिएंटेड डायनॅमिक लर्निंग सिस्टीम) प्रणालीवर आणले आहेत. त्याद्वारे ऑनलाईन पद्धतीने घरबसल्या आणि कोणत्याही ठिकाणाहून विद्यार्थ्यांना स्मार्टफोन, संगणकाच्या माध्यमातून शिक्षण घेता येत आहे. सध्या ७२०० विद्यार्थी हे मूडलचा वापर करत आहेत.

शिक्षण व्यवस्थापन यंत्रणा असलेल्या 'मूडल'चा विद्यापीठाने गेल्या दोन वर्षांपूर्वी शिक्षण पद्धतीमध्ये समावेश केला आहे. विद्यार्थ्यांना कोणत्याही ठिकाणाहून शिक्षण घेता यावे, या उद्देशाने अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्यावतीने त्याची सुरुवात केली. विद्यापीठाने कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतील विविध १२४७ अभ्यासक्रम 'मूडल'वर आणले आहेत. या अभ्यासक्रमांच्या नोटस्, प्रश्नपत्रिका आणि प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाचे व्हिडिओ, आदी उपलब्ध करून दिले आहेत. त्यामुळे स्मार्टफोन, संगणकाद्वारे अभ्यासक्रम पूर्ण करून पदवी घेणे आणि एखाद्या मुद्द्याबाबत शंका असल्यास त्याचे निरसन करून घेणे विद्यार्थ्यांना शक्य झाले आहे. ऑनलाईन पद्धतीने त्यांना चाचणी देता येते. या पद्धतीने सध्या ७२०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. डॉ. कविता ओझा, उर्मिला पोळ आणि परशुराम वडार यांनी याबाबत मार्गदर्शन केले आहे. २९१ महाविद्यालयांतील २९९ हून अधिक प्राध्यापक हे शिक्षण देत आहेत.

## असा करता येईल 'मूडल'चा वापर

विद्यापीठात विद्यार्थी प्रवेशित झाल्यानंतर त्याच्याकडून त्याचा मोबाईल, ई-मेल आयडीची माहिती अंतर्गत गुणवत्ता कक्षाकडून घेतली जाते. त्या ई मेलवर विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील मूडलची लिंक पाठविली जाते. या लिंकवर नोंदणी केल्यानंतर संबंधित विद्यार्थ्याचा आयडी आणि पासवर्ड तयार होतो. त्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मूडलचा वापर करता येतो. एखाद्या विद्यार्थ्याने अभ्यासाबाबतची शंका उपस्थित केल्यास त्याबाबतचा ई-मेल संबंधित प्राध्यापकांना जातो. प्राध्यापकांनी अभ्यासक्रमाबाबतचा नवी माहिती, व्हीडिओ अपलोड केल्यास त्याची माहिती ई-मेलद्वारे विद्यार्थ्यांना मिळते. यासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही.

# उद्या भू-अवकाश विज्ञानाबाबत कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात उद्या, गुरुवारी 'अर्थ अँन्ड स्पेस सायन्स' या विषयावर इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ जिओमॅग्नेटिझम (आयआयजी) आणि पदार्थ विज्ञान अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळा होणार आहे.

पदार्थ विज्ञान विभागाच्या सभागृहात सकाळी १० वाजता कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन होईल. त्यानंतर विद्यापीठ परिसरातील 'आयआयजी'च्या रडार सुविधा केंद्रात डॉ. माला बागिया, प्रा. एस. गुरुबारन, डॉ. गोपी सिमाला, मानसिंग टाकळे, सुकंठ साऊ, विनित एरम मार्गदर्शन करणार आहेत. त्याचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 6 FEB 2020

तरुण भारत

# विद्यापीठ खेलो इंडियासाठी हळदीच्या नाईक बंधूंची निवड

**हळदी :** ओरिसा भुवनेश्वर येथे होणाऱ्या अखिल भारतीय विद्यापीठ खेलो इंडिया स्पर्धेसाठी हळदी (ता.करवीर) येथील दोन खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. जलतरण क्रीडा स्पर्धेत हळदीचे नाईक बंधू शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचे प्रतिनिधित्व ओरिसा येथे करणार आहेत.

जलतरण क्रीडा स्पर्धेत बॅक स्ट्रोक आणि फ्री स्टाईलमध्ये शालेय राष्ट्रीय स्पर्धा गाजवणारे हळदी येथील राजवर्धन जयसिंग नाईक आणि हर्षवर्धन जयसिंग नाईक या दोन महाविद्यालयीन खेळाडूंची निवड विद्यापीठ खेलो इंडिया स्पर्धेसाठी झाली आहे. त्यांना शिवाजी विद्यापीठ जलतरण कोच प्रा.सुनील खराडे आणि शारीरिक शिक्षण संचालक पी.टी.गायकवाड यांचे मार्गदर्शन व सेक्रेटरी जयकुमार देसाई यांचे प्रोत्साहन लाभत आहे.



**हळदी : राजवर्धन आणि हर्षवर्धन नाईक यांच्यासमवेत मार्गदर्शक पी. जी. गायकवाड, प्रा. सुनील खराडे.**

विद्यार्थ्यांकडून गीत, लोकनृत्याचे सादरीकरण : हस्तलेखन स्पर्धेतील विजेत्यांचा सन्मान

# कलाविष्कारात 'कार्निव्हल'चा समारोप

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** गीत, लोकनृत्याच्या सादरीकरणाने रंगलेल्या कलाविष्कारामध्ये मंगळवारी शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातर्फे आयोजित 'कार्निव्हल'चा उत्साहात समारोप झाला. यावेळी हस्तलेखन स्पर्धेतील विजेत्यांचा सन्मान करण्यात आला.

रशियन, जपानी, पोर्तुगाल, जर्मनच्या संस्कृतीची ओळख करून देण्यासाठी विदेशी भाषा विभागाच्यावतीने कार्निव्हल या कला-सांस्कृतिक महोत्सवाचा सोमवारी प्रारंभ झाला. दुसऱ्या दिवशी मंगळवारी रशियन, जर्मन, जपानी आणि पोर्तुगीज भाषांतील विविध स्वरूपाचे खेळ, भाषिक कौशल्य उपक्रम व सांस्कृतिक कार्यक्रम या माध्यमातून विद्यार्थ्यांनी कलाविष्कार सादर केले. सरेल गीते, समूह आणि युद्धगीते, लोकनृत्य, प्रसंग नाट्य सादरीकरणाने महोत्सव रंगला. त्यातून उपस्थितांना रशियन, जपानी, जर्मन, पोर्तुगीज संगीत व नृत्य, विविध उत्सवांद्वारे प्रकट होणाऱ्या तेथील जनजीवन यांचा परिचय झाला. यावेळी हस्तलेखन स्पर्धेतील विजेते मैत्रेयी कुलकर्णी, साक्षी मेथे (रशियन), तनय कोळेकर (जर्मन), ज्योत्स्ना भाटवडेकर व दीपिका भोसले (जपानी) यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी विदेशी भाषा विभागाच्या प्रमुख डॉ. मेघा पानसरे, स्नेहा वझे, स्नेहल शेट्ये, शीतल कुलकर्णी, प्रियांका माळकर यांनी मार्गदर्शन केले.



**शिवाजी विद्यापीठात मंगळवारी विदेशी भाषा विभागातर्फे आयोजित कार्निव्हलचा समारोप झाला. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी लोकनृत्य सादर केले.**

# 'महावीर'मध्ये उद्या काव्यसंग्रह प्रकाशन

कोल्हापूर : महावीर महाविद्यालयात मराठी गौरव दिनानिमित्त उद्या, गुरुवारी लोकगीत पोस्टर प्रदर्शन होणार आहे. यावेळी माजी विद्यार्थिनी डॉ. सुप्रिया आवारे यांच्या 'न बांधल्या जाणाऱ्या घरात' या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन केले आहे. महावीर महाविद्यालयातील ॲम्फी थिएटरमध्ये दुपारी १२ वा. ज्येष्ठ कवयित्री नीरजा यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन होईल. शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. रणधीर शिंदे हे प्रमुख उपस्थित राहणार आहेत. तरी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे यांनी केले आहे.

# मानवी हस्तक्षेपामुळे जैवविविधता धोक्यात

## मधुकर बाचुळकर : कार्यशाळेत इशारा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** सध्या सर्वत्रच मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करून संवर्धन करण्याची गरज आहे. मानवी हस्तक्षेपामुळे जैवविविधता धोक्यात आली आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. मधुकर बाचुळकर यांनी केले.

गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विभाग व बी. व्होक सस्टेनेबल ॲग्रीकल्चर मॅनेजमेंट विभागाच्यावतीने 'बायो डायव्हर्सिटी कॉन्झर्वेशन' या विषयावर आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते.

डॉ. बाचुळकर म्हणाले, ऑस्ट्रेलियातील जंगलातील वणवा यासारख्या गंभीर घटना घडत असल्यामुळे मानवाने जैवविविधतेचे संरक्षण करणे काळाची गरज आहे.

जिल्ह्यात असणाऱ्या जैवविविधतेचा आढावा घेऊन शिवाजी विद्यापीठाच्या माध्यमातून दुर्मीळ वनस्पतींचा शोध घेऊन त्यांची नोंद करण्यात येत असून, लोकांमध्ये वृक्ष संवर्धनाची चळवळ रुजविण्याचा प्रयोग कौतुकास्पद आहे. प्रा. डॉ. मानसिंग निंबाळकर यांनी विद्यापीठातील लीड बोटॅनिकल गार्डनचे महत्त्व सांगितले.

प्रा. डॉ. आर. टी. पाटील यांनी आभार मानले. कार्यशाळेत विविध महाविद्यालयातील ६४ विद्यार्थ्यांनी व १५ सहयोगी प्राध्यापकांनी सहभाग घेतला होता. कार्यक्रमास प्राचार्य डॉ. पी. के. पाटील, उपप्राचार्य एस. एच. पिसाळ, प्रा. डॉ. मृणालिनी देसाई, प्रा.श्रुती पाटील, प्रा. डॉ. पी.डी. आवटे, प्रा. टी. एस. पाटील, तसेच सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वाढती बालन्यायालये चिंताजनक

## न्यायमूर्ती पंकज देशपांडे यांचे प्रतिपादन

कोल्हापूर टाइम्स टीम



कार्यशाळेत बोलताना न्यायमूर्ती देशपांडे. सोबत दिलशाद मुजावर, व्ही. बी. शेटे, बी. जी. काटकर, जे. के. पवार.

'बालकांकडून होत असलेल्या गुन्हेगारीच्या स्वरूपात बदल घडून येत असून आता त्यामध्ये लैंगिक गुन्हेगारीचाही समावेश झालेला आहे. या लैंगिक गुन्हेगारीसाठी सहज उपलब्ध असणारे मोबाइल तंत्रज्ञान कारणीभूत आहे. ही गोष्ट अत्यंत चिंताजनक आहे. त्यामुळे मुलांच्या वर्तनामध्ये होत असलेला हा बदल समजून घेण्यासाठी नव्याने संशोधन होणे आवश्यक आहे,' असे प्रतिपादन न्यायमूर्ती पंकज देशपांडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात आयोजित बालन्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम-२०१५ व दत्तक कायदा या विषयावर आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी केले. कार्यशाळेचे आयोजन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण कक्ष आणि विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्यावतीने केले होते.

न्यायमूर्ती देशपांडे म्हणाले, 'बालकांमध्ये वाढत जाणारी गुन्हेगारी प्रवृत्ती कायदा करून संपणार नाही, तर त्यासाठी समाजमन बदलणे आवश्यक आहे. मुलांमधील कायद्याची व शिक्षेची भीती नाहीसी होत आहे. या गोष्टीचे दुष्परिणाम संपूर्ण देशपातळीवर होत आहेत.'

प्राचार्य डॉ. जे. के. पवार म्हणाले, 'छत्रपती शाहू महाराज हे दृष्टे राजे होते. त्यांनी शंभर वर्षापूर्वीच बालकांच्या संरक्षणासाठी कायद्याची निर्मिती केली होती. आवश्यक आर्थिक तरतूदही केली होती. महाराजांनी बालकांसाठी केवळ कायदेच केले नाहीत तर त्याच्या अंमलबजावणीसाठी आर्थिक तरतूदही केली होती.' स्वागत आणि प्रास्ताविक जिल्हा महिला व बालविकास अधिकारी बी. जी. काटकर यांनी केली. तर सूत्रसंचालन अविनाश भाले यांनी केले.

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात डॉ. सतीश के. पाटील, ॲड. दिलशान मुजावर , व्ही. बी. शेटे, डॉ. प्रियदर्शिनी चोरगे यांनी विचार मांडले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 6 FEB 2020

तरुण भारत

# तंत्रज्ञान अधिविभागात 'टेक्नोसिस २०२०' उत्साहात

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभामध्ये 'टेक्नोसिस २०२०' या राज्यस्तरीय स्पर्धेस सोमवार पासून प्रारंभ झाला. रसायन अभियांत्रिकी शाखेच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे प्र–कुलगुरु प्रा.डॉ.डी.टी. शिर्के, तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकी शाखेचे अधिष्ठाता प्रा.डॉ.पी.एस. पाटील यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप. एस.बागी होते.

प्रा.डॉ.डी.टी.शिर्के यांनी, आंतरशाखीय संशोधन ही काळाची गरज असल्याचे सांगितले. डॉ. जयदीप.एस. बागी, प्रा.डॉ. पी.एस.पाटील यांनीही यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सुरूवात विज्ञान व तंत्रज्ञान तसेच सामाजिक कार्यात महिलांचे योगदान यावरील चलचित्रफीती दाखवून करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीपाल एम. गायकवाड यांनी केले. समारोपाच्या सत्रामध्ये औद्योगिक सुरक्षा आणि आरोग्य महाराष्ट्रचे उपसंचालक सुरेश जोशी, यांनी नोकरी देणारे नव उदयोजक घडावेत असे आव्हान केले तसेच विद्यार्थ्यांनी पुस्तके वाचण्याची सवय अंगी बाळगावी असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. पी. डी. पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता तपोजा दिवाण, डॉ. डी. एम. नांगरे, श्री. पी.पी.पाटील, सौ. वैशाली मोहीते, शितल देहनकर, प्रियंका पाटील, मोहीनी साबळे, श्री. ए.बी. मडावी आणि द्वितीय, तृतीय व अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.

# वाढत्या बालन्यायालयांची निर्मिती हे सदृढ समाजाचे लक्षण नव्हे

## न्यायमूर्ती देशपांडे; 'बाल न्याय अधिनियम व दत्तक कायदा' विषयावर कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

बालकांकडून होत असलेल्या गुन्हेगारीच्या स्वरूपामध्ये बदल घडून येत असून आता त्यामध्ये लैंगिक गुन्हेगारीचा समावेश झाला आहे. बालकांमध्ये होत असलेल्या लैंगिक गुन्हेगारीसाठी सहज उपलब्ध असणारे मोबाईल तंत्रज्ञान कारणीभूत आहे. ही गोष्ट चिंताजनक आहे. त्यामुळे मुलांच्या वर्तनामध्ये होत असलेला हा बदल समजून घेण्यासाठी नव्याने संशोधन होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन न्यायमूर्ती पंकज देशपांडे यांनी केले.



**कोल्हापूर : विद्यापीठात आयोजित 'बाल न्याय अधिनियम व दत्तक कायदा' विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना न्यायमूर्ती पंकज देशपांडे. डॉ. जे. के. पवार, बी. जी. काटकर, डॉ. जगन कराडे आदी.**

शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात आयोजित बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम व दत्तक कायदा विषयावर आयोजित एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

न्यायमूर्ती देशपांडे म्हणाले, बालकांमध्ये वाढत जाणारी गुन्हेगारी प्रवृत्ती कायदा करून संपणार नाही तर त्यासाठी समाजमन बदलणे आवश्यक आहे. मुलांमधील कायद्याची व शिक्षेची भीती नाहीशी होत आहे. या गोष्टीचे दुष्परिणाम मर्यादित स्वरूपात नसून ते देशपातळीवर होत आहेत. बालगुन्हेगारीमध्ये होत असलेल्या बदलांमुळे यंत्रणांपुढील आव्हाने बदलत आहेत. त्यामुळे या आव्हानांचा मुकाबला करण्यासाठी पूरक व्यवस्था निर्माण झाली पाहिजे.

बाल कल्याण समिती सदस्य प्राचार्य डॉ. जे. के. पवार म्हणाले, छत्रपती शाहू महाराज हे द्रष्टे राजे होते. त्यांनी संस्थानामध्ये शंभर वर्षांपूर्वी बालकांच्या संरक्षणासाठी कायद्याची निर्मिती केली व त्याच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेली आर्थिक तरतूद केली होती.

डॉ. जगन कराडे म्हणाले, मोबाईलच्या अती व चुकीच्या वापरामुळे नातेसंबंध बिघडत चालले आहेत. बालकांमध्ये लैंगिक गुन्हेगारी वाढत चाललेली आहे व त्याचे विपरीत परिणाम समाजामध्ये घडत आहेत. यातून मार्ग काढण्यासाठी जबाबदार नागरिकांची निर्मिती होणे आवश्यक आहे. प्रास्ताविक जिल्हा महिला व बालविकास अधिकारी बी. जी. काटकर यांनी केले. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले.

# विद्यापीठात उद्या 'अर्थ अँड स्पेस सायन्स' विषयावर कार्यशाळा

कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) : शिवाजी विद्यापीठात गुरुवारी (दि. २७) 'अर्थ अँड स्पेस सायन्स' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा व प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पनवेल येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ जिओमॅग्नेटिझम (आय.आय.जी.) आणि शिवाजी विद्यापीठ पदार्थविज्ञान अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. पदार्थविज्ञान विभागाच्या सभागृहात गुरुवारी सकाळी दहा वाजता कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन होईल. त्यानंतर सभागृहासह विद्यापीठ परिसरातील 'आयआयजी'च्या रडार सुविधा केंद्रात विविध सत्रात कार्यशाळा व प्रशिक्षण कार्यक्रम होणार आहेत.

2 6 FEB 2020

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'कार्निवल' मध्ये भाषा, कलासंस्कृतीचा परिचय

## चित्रकार संपत नायकवडी: शिवाजी विद्यापीठात सांस्कृतिक महोत्सवास उत्साहात प्रारंभ

प्रतिनिधी
कोल्हापूर

विदेशी भाषा, कला आणि संस्कृतीचा परिचय करून देणारा 'कार्निवल २०२०' हा उत्सव विविध संस्कृतींना जोडणारा दुवा आहे. त्यातून दूरदेशीच्या कलानिर्मिती प्रक्रियेच्या आनंदाची प्रचिती देतात, असे मत प्रसिद्ध चित्रकार संपत नायकवडी यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागामध्ये 'कार्निवल-२०२०' या कला-सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याच्या उद्घाटनप्रसंगी चित्रकार नायकवडी बोलत होते. मानव्यशास्त्र व कला विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, अर्चना देसाई व विदेशी भाषा विभागाच्या प्र. विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे उपस्थित होत्या.

परदेशी संस्कृतीचा भाग असलेल्या या पारंपरिक विविधरंगी कलावस्तू प्रेक्षकांना एक व्यापक व समावेशक दृष्टी देतात. लोकांच्या जीवनात रंग भरतात.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'कार्निवल २०२०' मध्ये युवकांनी सादर केलेल्या प्रर्शनास प्रतिसाद मिळाला.

परस्परांबद्दल स्नेह जागवतात, असे मत डॉ. मेघा पानसरे यांनी व्यक्त केले. महोत्सवात रशियन, जर्मन, जपानी व पोर्तुगीज भाषेच्या विद्यार्थ्यांनी त्या त्या देशातील पारंपरिक कलावस्तूंचे प्रदर्शन सादर केले.

यामध्ये रशियन समवार, मत्र्योश्का बाहुली, स्त्रियांचा पारंपरिक रंगीबेरंगी स्कार्फ, इकोना चित्रे, त्सार टोपी, पारंपरिक लाकडी व काचेच्या वस्तू तसेच रशियन रंगचित्रे यांची मांडणी करण्यात आली. महोत्सवामध्ये जपानी भाषेच्या विभागाने आकर्षक जपानी चित्रे, 'ओरीगामी'चे विविध प्रकार, 'साकुरा' फुले आणि माउंट फुजीची कलाकृती, बुलेट ट्रेनचे मॉडिल, जपानी घराची व मंदिराची प्रतिकृती, जपानी राहणीमानाबद्दल माहिती देणारे फलक आणि शिबोरी प्रकारातील विविध पर्यावरणस्नेही वस्तूंचे सुंदर प्रदर्शन भरवले आहे. यामधील बुलेट ट्रेनचे चलत मॉडिल आणि शिन्चेन व जपानी छत्री-पंखा यासह 'सेल्फी पॉइंट' हे आकर्षणाचे केंद्र बनले. जर्मनीचे बीएमडब्ल्यू फोक्सवगन कंपन्यांच्या मोटारींची मॉडिल्स, फुटबॉल, हाम्बुर्ग व बर्लिन शहरे यांची माहिती व त्यांची वैशिष्ट्ये प्रदर्शित करण्यात आली. जर्मनीतील 'ऑक्टोबर फेस्ट' व 'बीअर फ़ेस्ट' हे उत्सव लोकप्रिय आहेत. तसेच प्राचीन किल्ल्यांची माहिती प्रदर्शित करण्यात आली. पोर्तुगीज भाषेच्या विद्यार्थ्यांनी पोर्तुगालमधील सिरॅमिक प्लेट्स व पोर्सिलीन वस्तू कीचेन, फ्रीज मॅंट, स्कार्फ, पारंपारिक ॲप्रन, आदिवासींनी जंगलातील बियांपासून बनवलेली टोपी, पिंग, गालीन्या, कांफे, परफ्युम या वस्तूंचे प्रदर्शन केले. त्याबरोबरच काल्दू वेर्द, फेजुआद व मुस द चोकोलात हे पारंपरिक पोर्तुगीज खाद्यपदार्थ बनवून खाण्यासाठी उपलब्ध करून दिले. रशियन, जर्मन, जपानी व पोर्तुगीज या भाषांच्या संस्कृतीचा परिचय करून देणाऱ्या पुस्तकांची मांडणी आकर्षित करत होती.

# मानवामुळे जैवविविधता धोक्यात : डॉ. बाचूळकर

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

मानवी हस्तक्षेपामुळे जागतिक पातळीवर उदा. ऑस्ट्रेलियातील जंगलातील वणवा यासारख्या गंभीर घटना घडत असल्यामुळे मानवाने जैवविविधतेचे संरक्षण करणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन माजी प्रा. डॉ. मधुकर बाचूळकर यांनी केले. यावेळी त्यांनी जागतिक स्तरावरील जैवविविधतेची सविस्तर माहिती देऊन सध्या मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करून संवर्धन करण्याची गरज असल्याचे सांगितले.

गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विभाग व बी. व्होक सस्टेनेबल ॲग्रीकल्चर मॅनेजमेंट विभागाच्या वतीने संयुक्तरीत्या बायो डायव्हर्सिटी कॉन्झर्वेशन विषयावरील एकदिवसीय कार्यशाळा मोठ्या उत्साहात झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. पी. के. पाटील होते. स्वागत व प्रास्ताविक विभागप्रमुख प्रा. डॉ. आर. पी. जाधव यांनी केले. प्रमुख पाहुणे माजी प्राचार्य डॉ. मधुकर बाचूळकर यांच्या हस्ते रोपाला पाणी घालून कार्यशाळेचे उद्‌घाटन करण्यात आले.

प्रथम सत्रात बोलताना माजी प्राचार्य डॉ. मधूकर बाचूळकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले, तर दुसऱ्या सत्रात बोलताना प्रा. डॉ. मकरंद ऐतवडेकर यांनी कोल्हापूर जिल्ह्यात असणाऱ्या जैवविविधतेचा आढावा घेऊन शिवाजी विद्यापीठाच्या माध्यमातून दुर्मीळ वनस्पतींचा शोध घेऊन त्याची नोंद करण्यात येत असून, लोकांच्यामध्ये वृक्ष संवर्धनाची चळवळ रुजवण्याचा प्रयोग कौतुकास्पद आहे, असे मत याप्रसंगी व्यक्त केले. तृतीय सत्रात बोलताना प्रा. डॉ. मानसिंग निंबाळकर यांनी विद्यापीठातील लीड बोटॅनिकल गार्डनचे महत्त्व विशद करून जैवविविधतेचे फायदे -तोटे सांगितले.

कार्यशाळेत विविध महाविद्यालयांतील ६४ विद्यार्थ्यांनी व १५ सहयोगी प्राध्यापकांनी सहभाग घेतला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते सहभागींना प्रमाणपत्रे देण्यात आली. कार्यक्रमास शिक्षण प्रसारक मंडळाचे सेक्रेटरी प्रा. जयकुमार देसाई, पेट्रन कौन्सिल मेंबर दौलत देसाई, प्रशासन अधिकारी प्रा. डॉ. मंजिरी मोरे यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमास प्राचार्य डॉ. पी. के. पाटील, उपप्राचार्य एस. एच. पिसाळ, मृणालिनी देसाई, श्रुती पाटील, सी.पी. डी. आवटे, सी.टी.एस. पाटील आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. सी. फडणवीस यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 6 FEB 2020
तरुण भारत

# मानवी हस्तक्षेपामुळे जैवविविधता धोक्यात

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

- **डॉ. मधुकर बाचुळकर यांचे मत**
- **गोखले कॉलेज आयोजित बायो डायव्हर्सिटी कॉन्झरवेशन कार्यशाळा**

जैवविविधतेत दिवसेंदिवस मानवी हस्तक्षेप वाढत चालला आहे. वृक्षारोपण करण्याऐवजी वृक्षतोडीवर जादा भर दिला जात आहे. ऑस्ट्रेलियात जसे जंगलांना आगी लागल्या जातात, तशा आगी भारतातील जंगलांना लागणार नाहीत, याची खबरदारी घेणे नितांत गरजेचे झाले आहे. मात्र खबरदारीच घेतली नाही तर सध्या जितका जैवविविधतेला धोका पोहोचला आहे, त्याच्या कितीतरी पटीने धोका वाढेल, अशी भिती प्राचार्य डॉ. मधुकर बाचुळकर यांनी व्यक्त केली.

गोखले कॉलेजमधील वनस्पती विभाग व बी. व्होक सस्टेनेबल ॲग्रीकल्चर मॅनेजमेंट विभाग यांच्या वतीने आयोजित केलेल्या बायो डायव्हर्सिटी कॉन्झरवेशन विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते. रोपाला पाणी घालून कार्यशाळेचे पर्यावरणपूरक उद्घाटन करण्यात आले. अध्यक्षस्थानी गोखले कॉलेजचे प्राचार्य डॉ. पी. के. पाटील होते. कार्यशाळेसाठी विविध महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांना निमंत्रित केले होते. त्यांना डॉ. बाचूळकर यांनी जगातील जैवविविधतेची सविस्तर माहिती सांगितली. तसेच भारतात युद्धपातळीवर वृक्षलागवडीची मोहीम राबविणे गरजेचे असल्याचे विशद केले. प्रा. डॉ. मकरंद ऐतवडेकर यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील जैवविविधतेचा आढावा घेतला. प्रा. डॉ. मानसिंग निंबाळकर यांनी शिवाजी विद्यापीठातील लीड बोटॅनिकल गार्डनचे महत्व विशद करत जैवविविधतेचे फायदे पटवून सांगितले.



यावेळी गोखले कॉलेजचे उपप्राचार्य एस. एच. पिसाळ, प्रा. डॉ. मृणालिनी देसाई , प्रा. श्रुती पाटील, प्रा. पी. डी. आवटे, प्रा. टी. एस. पाटील आदी उपस्थित होते. प्रा. डॉ. आर. पी. जाधव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. आर. टी. पाटील यांनी आभार मानले.

# ‘कार्निव्हल-२०20’ महोत्सवाचे उद्घाटन

## विदेशी भाषा विभागातर्फे आयोजन; रशियन, जर्मन, जपानी व पोर्तुगीज संस्कृतीचा परिचय

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २५ : शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागामध्ये ‘कार्निव्हल-२०२०’ या कला-सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन समारंभ झाला. प्रसिद्ध चित्रकार संपत नायकवडी, मानव्यशास्त्र व कला विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, चित्रकार श्रीमती अर्चना देसाई व विदेशी भाषा विभागाच्या प्र. विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे उपस्थित होत्या.

विदेशी भाषा, कला आणि संस्कृतीचा परिचय करून देणारा हा उत्सव विविध संस्कृतींना जोडणारा दुवा आहे. त्यातून दूरदेशीच्या कलानिर्मिती प्रक्रियेच्या आनंदाची प्रचीती देतात, असे मत उद्घाटक संपत नायकवडी यांनी व्यक्त केले.



परदेशी संस्कृतीचा भाग असलेल्या या पारंपरिक विविधरंगी कलावस्तू प्रेक्षकांना व्यापक दृष्टी देतात. लोकांच्या जीवनात रंग भरतात. परस्परांबद्दल स्नेह जागवतात, असे मत डॉ. मेघा पानसरे यांनी याप्रसंगी व्यक्त केले. महोत्सवात रशियन, जर्मन, जपानी व पोर्तुगीज भाषेच्या विद्यार्थ्यांनी त्या त्या देशातील पारंपारिक कला वस्तूंचे प्रदर्शन सादर केले. यामध्ये रशियन समवार, मत्र्योश्का बाहुली, स्त्रियांचा पारंपरिक रंगीबेरंगी स्कार्फ, इकोना चित्रे, त्सार टोपी, पारंपरिक लाकडी व काचेच्या वस्तू, तसेच रशियन रंगचित्रे यांची मांडणी केली.

महोत्सवामध्ये जपानी भाषेच्या विभागाने आकर्षक जपानी चित्रे, ‘ओरीगामी’चे विविध प्रकार, ‘साकुरा’ फुले आणि माउंट फुजीची कलाकृती, बुलेट ट्रेनचे मॉडेल, जपानी घराची व मंदिराची प्रतिकृती, जपानी राहणीमानाबद्दल माहिती देणारे फलक आणि शिबोरी प्रकारातील विविध पर्यावरण स्नेही वस्तूंचे सुंदर प्रदर्शन भरवले. यामधील बुलेट ट्रेनचे चलत मॉडेल आणि शिन्चेन व जपानी छत्री-पंखा यासह "सेल्फी पॉइंट' हे आकर्षणाचे केंद्र बनले.

जर्मनीचे बी.एम.डब्ल्यू, फोक्सवागन कंपन्यांच्या मोटारींची मॉडेल्स, फुटबॉल, हाम्बुर्ग व बर्लिन शहरे यांची माहिती व त्यांची वैशिष्ट्ये प्रदर्शित केली. जर्मनीतील "ऑक्टोबर फेस्ट' व "बीअर फेस्ट' हे उत्सव लोकप्रिय आहेत. तसेच प्राचीन किल्ल्यांची माहिती प्रदर्शित केली.

सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत "ओरिगामी' कार्यशाळा झाली. यामध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थी, मुले व नागरिक सहभागी झाले. यामध्ये अर्चना देसाई यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेत विविध आकर्षक फुले, लॅम्पशेड, बाउल, गांधी टोपी व इतर वस्तू बनवल्या. ‘कार्निव्हल’ आयोजनात स्नेहल शेट्ये, स्नेहा वझे, ऐश्वर्या चव्हाण, शीतल कुलकर्णी, प्रियांका माळकर या विदेशी भाषा शिक्षकांनी मार्गदर्शन केले.

### पोर्सिलीन वस्तू आणि...

पोर्तुगीज भाषेच्या विद्यार्थ्यांनी पोर्तुगालमधील सिरॅमिक प्लेट्स व पोर्सिलीन वस्तू, की चेन, फ्रीज मॅग्नेट, स्कार्फ, पारंपरिक ॲप्रन, आदिवासींनी जंगलातील बियांपासून बनवलेली टोपी, पिंग, गालीन्या, काफे, परफ्युम या वस्तूंचे प्रदर्शन केले. त्याबरोबरच काल्दू वेर्द, फेजुआद व मुस द चोकोलात हे प्रसिद्ध पारंपरिक पोर्तुगीज खाद्यपदार्थ बनवून सर्वांना खाण्यासाठी उपलब्ध करून दिले. रशियन, जर्मन, जपानी व पोर्तुगीज या सर्वच भाषांच्या संस्कृतीचा परिचय करून देणारी पुस्तके व शब्दकोश, बालसाहित्याची सुरेख मांडणी प्रेक्षकांना आकर्षित करत होती.

# तंत्रज्ञान विभागातर्फे ‘टेक्नोसिस २०२०’ स्पर्धा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २५ : शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातर्फे टेक्नोसिस २०२० या राज्यस्तरीय स्पर्धेचे रसायन अभियांत्रिकी शाखेत आयोजन केले. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकी शाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील प्रमुख पाहुणे होते. तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप एस. बागी अध्यक्षस्थानी होते.

प्रा. डॉ. पाटील यांनी विद्यार्थ्यांना स्वतःचे स्थान कशा प्रकारे करता येईल, हे काही उदाहरणांचा दाखला दिला. प्रा. डॉ. शिर्के यांनी संशोधनाची सुरुवात ही एखादी समस्या आणि तिचे निराकरण कसे करावे? तसेच शिक्षण ही एक निरंतर प्रक्रिया असून जिज्ञासा हे त्याचे मूळ होय. आंतरशाखीय संशोधन ही काळाची गरज आहे. या संकल्पना त्यांनी विचारांतून विद्यार्थ्यांसमोर व्यक्त केल्या.

डॉ. बागी यांनी विद्यार्थ्यांची जडण-घडण होण्यासाठी अशा स्पर्धात्मक कार्यक्रमांची गरज आहे. अधिविभागात असे कार्यक्रम वेळोवेळी घेतले जातात, असे नमूद केले. विज्ञान व तंत्रज्ञान तसेच सामाजिक कार्यात महिलांचे योगदान यावरील चलचित्रफिती दाखविली. श्रीपाल एम. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. विविध महाविद्यालयाच्या २०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेत Innovative startup Ideas (ISI), Solution for Industrial Problem(SIP), Interview Skill Test(ISI), Quiz- Competition याबरोबर Chem Race, Starch Walk या मनोरंजनात्मक स्पर्धांचे आयोजन केले. औद्योगिक सुरक्षा आणि आरोग्याचे उपसंचालक सुरेश जोशी यांनी नोकरी देणारे नवउद्योजक घडावेत, असे आव्हान केले. तसेच विद्यार्थ्यांनी पुस्तके वाचण्याची सवय अंगी बाळगावी, असे सांगितले. डॉ. पी. डी. पाटील यांनी आभार मानले.

तपोजा दिवाण, डॉ. डी. एम. नांगरे, वैशाली मोहिते, शीतल देहनकर, प्रियंका पाटील, मोहीनी साबळे, ए. बी. मडावी आणि द्वितीय, तृतीय, अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांचे मार्गदर्शन लाभले.